# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक दूरध्वनी क्रमांक (वै) - कार्यालय दूरध्वनी क्र. - | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३१ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७२ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटुंब कल्याण भवन, राजाबहादूर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे, पुणे ४११ ००१. फॅक्स नं.- ०२० - २६०५८७३३ / २६०५८३१८ / २६०५८१०१<br>Email ID : jssk.cell@gmail.com |
| आरोग्य सेवा | | जा.क्र.राकुकका/जशिसुका./मोफत सेवा/माहिती/ कक्ष-१०(व)/न.क्रं.३११/ ८५८०५१ - ८२०/११<br>दिनांक :- २३/१२/२०११ |


प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, ......... (सर्व)

२) जिल्हा शल्य चिकित्सक,
सामान्य रुग्णालय, ...... (सर्व)

**विषय :- जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत मोफत सेवांबाबतची माहिती रुग्णालयात दाखल झालेल्या मातांना देण्याबाबत.**

राज्यामध्ये दिनांक ७ ऑक्टोंबर, २०११ पासून जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत प्रसुतीसाठीच्या मातेला व ३० दिवसापर्यंतच्या आजारी असलेल्या नवजात अर्भकास मोफत उपचार, मोफत आहार, मोफत रक्त पुरवठा, मोफत प्रसुती व आवश्यकतर सिझेरियन सेक्शन या सुविधा देणे आवश्यक आहे.

तथापि अद्यापही लाभार्थी पर्यंत या कार्यक्रमाबाबतची माहिती पोहोचलेली नाही असे आढळून आले आहे. यासाठी जिल्हा रुग्णालय/स्त्रि रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र येथे प्रसुतीपुर्व तपासणीसाठी येणा-या लाभार्थीना व त्यांच्या नातेवाईकांना तसेच रुग्णालयात प्रसुतीसाठी दाखल झालेल्या मातांना त्या-त्या संस्थेतील/वार्डमधील अधिपरिचारिका/आरोग्य सेविका/ आरोग्य सहाय्यिका यांनी व्यक्तिशः माहिती दयावी. मोफत वाहतुक व्यवस्थेसंबंधी माहिती दयावी व जिल्हयाचा टोल फ्री, दुरध्वनी क्रमांकबाबत माहिती दयावी.

प्रस्तुत विषयी जिल्हा शल्य चिकित्सक/जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त प्रत्येक आरोग्य संस्थेत कार्यवाही होईल यासाठी सूचना दयाव्यात. तसेच कार्यक्षेत्रातील भेटीमध्ये पर्यवेक्षिय अधिकारी कर्मचारी यांच्यामार्फत पडताळणी करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा.

अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा, करिता
कुटुंब कल्याण,माताबाल संगोपन व शालेय आरोग्य,पुणे

<u>प्रत सविनय सादर :-</u>

१) मा.संचालक, आरोग्य सेवा महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा.आयुक्त (कुटुंब कल्याण) संचालक राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई.
३) मा.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय मुंबई.